प्रेसनोट दि.२८/०४/२०१९

# मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.

## वाहतुकीस अडथळा निर्माण करणाया बेशिस्त ठेकेदारावर कारवाईचा बडगा

दि.२७/०३/२०१९ रोजी वरिष्ठ पोलीस निरीखक, संपत डी. भोसले, मुंढवा पोलीस ठाणे हे केशवनगर भागामध्ये पेट्रोलिंग करीत असताना १९.०० वा च्या सुमारास गायराणवस्तीकडे जाणाऱ्या रोडवर मोठया प्रमाणात वाहतुक ठप्प झाल्याचे दिसून आल्याने त्यांनी स्वतः व ऑपरेटर पोलीस शिपाई सागर चौधरी यांनी तेथे जावून पाहणी केली असता, ट्रॅक्टर चालक व काही कामगार कोणतीही सुरक्षीततेची दक्षता न घेता व रोडवरच काम करीत असल्याचे दिसून आल्याने त्यांचेकडे वाहतुक विभागाचे नाहरकत पत्राची मागणी केली असता, त्यांनी ते दाखविले. परंतु, सदर नाहरकत पत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे पालन न करता काम करीत असल्याने व मोठया प्रमाणात वाहतुक ठप्प झाल्याने नमूद ट्रॅक्टर चालक किरण सुरेश जाधव व कामगारांना काम बंद करणेस लावून वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संपत डी. भोसले व पोलीस शिपई सागर चौधरी यांना स्वतः तेथील वाहतुक सुरळीत केल्याने व धोकादायकरित्या काम करणाया ठेकेदारांमुळे नागरीकांचे प्राण जावू शकतात अशा ठेकेदारांवर कारवाई केलेने स्थानिक व्यवसायीक व नागरीकांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले.

सदरचे काम एम.एन.जी.एल कंपनीचे गॅस पाईपलाईनचे असल्याने व त्या कामाचा ठेका दिपक कन्स्ट्रक्शनचे प्रशांत रामजीभाई पटेल व ट्रॅक्टर चालक किरण सुरेश जाधव हे करीत होते म्हणून यांचे विरुध्द मुंढवा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १२४/२०१९ भा.द.वि.कलम २८३,२९१,१८८ प्रमाणे गुन्हा नोंद करुन कारवाई करण्यात आलेली आहे.

(संपत डी. भोसले)
वरीष्ठ पोलीस निरीक्षक
मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर